वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. पी.एल. नरहरे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. माझ्या जमिनीचा गट क्र.१२४ आहे. सदर जमीन वडीलोपार्जित आहे. त्याचा जुना सर्वे नंबर मला माहीत नाही. सर्वे नंबरचा गट नंबर कधी पडला याबाबत मला माहीत नाही. माझ्या जमिनीच्या पुर्वेकडे प्रतिवादीची जमीन आहे, पश्चिमेकडे सत्यदास मल्लेशी व बापूराव पिटले यांची जमीन आहे, उत्तरेकडे राणी अंकुलगा शिव आहे व दक्षिणेकडे संजीव मल्लेशी व प्रतिवादी यांची जमीन आहे. गट क्र.१२४ मध्ये मला अंदाजे १ हे. ६१ आर जमीन आहे. प्रतिवादीच्या जमिनीचा गट क्र.१२६ आहे. सदर गट माझ्या जमिनीच्या पुर्व व दक्षिण बाजुला आहे. प्रतिवादीची जमीन वडीलोपार्जित आहे. प्रतिवादीच्या वडीलांनी १ हे. ७३ आर जमीन विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी घेतल्यानंतर १ हे. ७३ आर जमीन त्यांच्या ताब्यात होती.

२. गजराबाईच्या जमिनीचा गट नं.१२४ आहे. गजराबाईच्या जमीन माझ्या जमिनीच्या दक्षिणेस आहे. मी गट क्र.१२४ चा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. गट क्र.१२४ च्या ७/१२ उताऱ्यावर दावा दाखल करतेवेळी वादींची नावे आहेत. गट क्र.१२४ दक्षिण-उत्तर लांब आहे. गट क्र.१२५ चा ७/१२ उतारा मी पाहिलेला आहे. सदर गट वादींच्या नावे आहे. गट क्र.१२५ गट क्र.१२६ च्या पुर्व दिशेला आहे. गट क्र.१२५ दक्षिण-उत्तर लांब आहे. गट क्र.१२५ च्या दक्षिणेकडे नरसिंग सुरवसे यांची जमीन, पश्चीमेला विनुराज मल्लेशी, पुर्वेस संजीव मल्लेशी व उत्तरेकडे राणी अंकुलगा शिव आहे. गट क्र.१२५ चा क्षेत्र १ हे. ६३ आर आहे.

३. माझ्या वडीलांनी गट क्र.१२६ मधील जमिनीचे ठरावपत्र रामण्णा यांच्याकडून १९९५ साली करुन घेतली आहे. सदर जमिनीच्या पुर्वेला प्रतिवादीची जमीन, दक्षिणेकडे संजीव मल्लेशी, उत्तरेस व पश्चीमेस माझी स्वतःची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीचा ठरावपत्राप्रमाणे मालकी मिळण्याकरीता दावा दाखल केला होता. सदर ठरावपत्रावर माझी सही नाही. सदर ठरावपत्र माझ्यासमक्ष झालेले नाही. सदर ठरावपत्रात काय लिहीले आहे याची मला माहीत आहे. ठरावपत्रामध्ये जमिनीचा सर्वे नं.५६ नमूद आहे. ठरावपत्र करुन देताना लिहून देणार यांचे वय किती होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामण्णा मल्लेशी १९९० पासून आजारी नव्हते. परंतु त्यांना हिंडता फिरता येत नव्हते. १९९० मध्ये ते आजारी पडले व १९९३ साली त्यांचे डोळे गेले याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील ठरावपत्र रामण्णा यांनी करुन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामण्णाच्या पश्चात माझ्या वडीलांनी सदर ठरावपत्र करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, ठरावपत्रातील नमूद जमीन माझ्या वडीलांच्या ताब्यात नव्हती अथवा माझ्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, ठरावपत्राआधारे मला सदर दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही.

४. गट क्र.५६ मधून कॅनॉल गेला आहे. सदर कॅनॉलकरीता कोणत्या गटामधील, कोणाची व किती जमीन संपादीत झाली आहे हे मला माहीत नाही. सदर कॅनॉल दक्षिण-उत्तर आहे. सदर कॅनॉल प्रतिवादीच्या जमिनीच्या पश्चीमेकडून गेला आहे व माझ्या गट क्र.१२४ मधील जमिनीच्या पुर्वेमधून गेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कॅनॉलच्या पुर्वेकडील बाजुने

प्रतिवादीचा ताबा आहे व पश्चीमेकडील बाजुने आमचा ताबा आहे. गट क्र.१२६ ची चतुःसीमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२६ मधील जमिनीवर आमचा कोणताही ताबा नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादीच्या जमिनीवर बेकायदेशीर ताबा केला अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२६ मध्ये संपूर्ण जमीन प्रतिवादीच्या मालकी व ताब्यात आहे. मनकर्णाबाई व केवळबाई हे गावात नसल्यामुळे त्यांची व माझी ओळख नाही. गट क्र.१२६ चा ७/१२ उतारा मी पाहिलेला नाही. त्यामुळे त्यावर कोणाची नावे आहेत हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यासोबत दाखल केलेलया कच्चा नकाशातील मजकूर चुकीचा व खोटा आहे. गट क्र.१२४, १२५ व १२६ ची गाव नकाशावरील स्थिती मला माहीत नाही. गाव नकाशामध्ये कोणता गट कोणत्या बाजुने आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात तुकडेबंदीचा जो टोच नकाशा दाखल केला आहे तो अधिकाऱ्यांशी संगनमत करुन दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२६ वर मी पेरणी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२६ वर आमचा ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२४ माझ्या मालकी व ताब्याचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१२६ मधील जमीन माझ्या ताब्यात असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनकर्णाबाईशी संगनमत करुन मी दुसरा दावाही दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील व सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.03.17 17:08:25 +0530

दि.१७/०३/२०२५

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.